
एका मुलाची गोष्ट
श्री. रमेश खानविलकर
पाणिनी प्रकाशन

# एका मुलाची गोष्ट

रमेश खानविलकर



पाणिनी ई-बुक

पाणिनी प्रकाशन, ठाणे

एका मुलाची गोष्ट

रमेश खानविलकर

प्रकाशक व मुद्रक:
पाणिनी प्रकाशन / पाणिनी ई-बुक
श्वेता चव्हाण
संगीता चव्हाण
१४०४, ए विंग, ट्विंकल टॉवर,
हायलँड पार्क जवळ, ढोकाळी,
ठाणे - ४००६०७.

© रमेश खानविलकर
२/शांताबाई निवास,
शिवाजी नगर, टेंभीपाडा रोड,
भांडुप (प), मुंबई ४०००७८
संपर्क : ९८९२२४१८५५

अक्षर जुळणी - शिल्पा शिंदे

प्रथमावृत्ती : २५ फेब्रुवारी २०२०

किंमत २५ रु. फक्त

# ◈ एका मुलाची गोष्ट ◈

श्रावण महिना सुरु होता.बाहेर मुसळधार पाऊस पडत होता. विजांचा खडखडाट सुरु होता ,रस्त्यावरून पाण्याचे पाट वाहत होते.त्यामुळे सर्व लोक आपापल्या घरात दरवाजे बंद करुन बसले होते. गणेश नगर सारख्या गजबजल्या भागात सुमसाम होती. त्या पावसात हाफ पॅन्टवर छिद्रे असलेली बनियन घातलेला, साधारणपण ८/९ वर्षाचा मुलगा डोक्यावर टोपली व टोपलीत गवार,भेंडी ,मेथी, मिरच्या कोथिंबीर आणि त्यासोबत वजन करणारा तराजू घेवून तो मुलगा ओरडत होता

‘‘भाजी घ्या हो भाजी ...

भेंडी घ्या ! गवार घ्या .... भाजी घ्या भाजी ... ’’

तेवढयात रस्त्यावरुन ओरडत असताना रस्त्याच्या कडेला असलेल्या चाळीतील रुम मधील एका महिलेने दरवाजा उघडला आणि त्या भाजी विकणाऱ्या पोराला हाक मारली

‘‘ ये भाजीवाल्या...ये पोरा ...ये इकडे ये ’’

तो भाजीवाला पोरगा पटकन धावत त्या बाईकडे गेला.

त्याचा चेहरा उजळला होता.त्या बाईने भाजीचा भाव विचारला,

‘‘काय रे.. गवार कशी .... भेंडी कशी पाव किलो.’’

त्या पोराने भाव सांगितला. पण ती बाई भावासाठी घासाघीस करु लागली.

ती बाई घरातून भाजीचा भाव करत होती व तो भाजीवाला पोरगा तिच्या घराच्या दरवाज्यात भरपावसात उभा राहून ओलाचिंब होवून त्या बाईला भाजीचा भाव सांगत होता.शेवटी भाव ठरला व ती बाई भाजी

घेणार...

तेवढयात शेजारची बाई बाहेर आली ‘‘काय हो अंतुची आई ? चांगली आहे का भाजी ? अगं बाई...अंतुची आई.अहो हा भाजीवाला पोरगा बघा किती भिजलाय.. काय रे ! पोरा... पावसात भिजायला मज्जा येतेय ?’’

‘‘नाय हो मावशी ? मी आता भाजी विकली नाही तर उदया भाजी खराब होईल आणि खूप पाऊस असल्याने बाहेर भाजी घ्यायला कोणी गिऱ्हाईक नाही.घ्या ना तुम्ही ही भाजी .. ताजी आहे.’’

‘‘बरं ... बरं...! मेथी जुडी कशी ?’’

‘‘ मावशी ५ रुपये..बघा ताजी आहे.’’

‘‘नाय ..नाय.. दोन रुपयाला दे !’’

‘‘ नाय मावशी मुद्दल भावाला दिली.’’

‘‘ बरं..बरं..दे ’’

भाजीवाल्या पोराच्या अंगावरुन पाउस धो..धो.. पडत होता...

म्हणून त्या पोरांने अंगावरच्या ओल्या बनियनने तोंड पुसायला घेतले तेवढयात त्या मेथीची भाजी घेणाऱ्या बाईने हातचलाखीने दोन मेथीच्या जुडया एकत्र करुन...त्या मुलाच्या हातावर २ रुपये ठेवले व लगेच घरात गेली.

‘‘अहो मावशी ... तुम्ही दोन जुडया घेतल्या आणि फक्त दोन रुपयेच दिले.’’

‘‘ ये..पोरा अरे मी एकच जुडी घेतली. काय विचित्र पोरगा आहे. बघा ना अंतूची आई !’’

‘‘नाय रे जा तिकडे.खोट बोलतोस.’’

तो पोरगा तिच्या घरात घुसून त्या बाईकडे जिथे त्या मेथीच्या जुडया ठेवल्या होत्या तेथून उचलून परत बाहेर येवून त्या बाईला त्या जुडया दाखवू लागला

‘‘ बघा मावशी ....या दोन जुडया ”

‘‘अगं बाई... दोन का ? अरं माझ्या लक्षात नाही आल.बरं...बरं....” त्या बाईचा चेहरा कावरा बावरा झाला होता.

त्या भाजीवाल्या पोराने दोन रुपये घेवून आपली टोपली उचलली व तो पुढे गेला.

‘‘ भाजी घ्या हो ....भाजी... ताजी ताजी भाजी...

भेंडी..गवार..मेथी .घ्या...भाजी घ्या...”

असे करत दुपारी २ ते ४ पर्यंत त्या पोराने त्याच्या टोपलीतील सर्व भाजी विकली व घरी गेला.

तोच भाजीवाला पोरगा कधी कधी दुपारी २ वाजता दूध केंद्रावर दुधाच्या बाटल्या घेण्याच्या रांगेत उभा असायचा.

साधारणपणे ३५ वर्षापूर्वी दूध वाटप करण्यासाठी शासनाचे दूध केंद्र असत. त्या दूध केंद्रावर काचेच्या बाटली मधून दूध विक्री होत असे. सकाळ- दुपारी.

दुपारी शासनाची दुधाच्या बाटलीची गाडी प्रत्येक दूध केंद्रावर १.३० ते २ पर्यंत येईल. मात्र लोक १ वाजल्यापासून रांगेत उभे राहत व दूध घेत. काहीजण घरोघरी दूध टाकणाऱ्या मुलांकडून दुधाच्या बाटल्या घेत त्या मोबदल्यात प्रत्येक बाटली मागे २ रुपये दिले जात असत. ‘‘तो पोरगा” त्या दूध केंद्राच्या रांगेत उभा राहून २०/२५ बाटल्या घेत असे व त्या घरोघरी नेवून देत असे.त्याच्या मोबदल्यात त्याला प्रत्येक दिवशी ४०ते५० रुपये मिळत. ते पैसे ‘‘तो पोरगा” आपल्या आईला नेवून देत असे.कारण त्या पैशातून त्याची आई तांदूळ, मीठ, मसाला, पीठ, घासलेट नाही तर लाकडं आणून संध्याकाळ साठी स्वयंपाक करी कधी चुलीवर तर कधी स्टोव्हवर.

कधी कधी हाच ‘‘पोरगा’’ कचऱ्याच्या  ढिगाऱ्यात काय-काय शोधत असे.

त्याच्या हातात एक गोण असे. त्या पिशवित हाच पोरगा त्या कचऱ्याच्या  ढिगाऱ्यातील रिकाम्या बाटल्या,लोखंड व भंगार जमा करुन भंगारवाल्याच्या दुकानात नेवून विकत असे.त्यातून कधी कधी त्याला १०/१५ रुपये मिळत ते पैसे तो आपल्या आईच्या हातावर नेवून ठेवत असे.

कधी कधी  हाच ‘पोरगा’ वडापावच्या गाडीवर ‘वडापाव’ विकताना दिसे व  त्याच्या जोडीला ४० वर्षाचा माणूस वडे तळताना दिसत असे. ‘तो पोरगा’ गरम गरम वडे पावात घालून त्यात चटकदार चटणी भरून गिऱ्हाईकाला देत असे व तो माणूस व पोरगा रात्री आपल्या घरी जात व झालेल्या फायदयातून घरी संध्याकाळी जेवण तयार होत असे. जे जेवण तयार होई. ते सर्व कुटूंब  एकत्र बसून जेवी.

‘तो पोरगा’ कधी भाजी विके, कधी दूध विके, कधी भंगार जमा करीत, कधी  सणासुदीला, झेंडुची तोरणे विके तर सणासुदिला जे विकले जात होते ते विके.

असे करता करता आणि एके दिवशी ‘तो पोरगा’ दहावीच्या परीक्षेला बसला. मार्च महिना होता. त्या पोराच्या घरात विजेचा बल्ब नव्हता, म्हणून घासलेटच्या दिव्यावर ‘तो  पोरगा’ रात्री २ वाजेपर्यंत व परत सकाळी ४ वाजता उठून अभ्यास करायचा. कारण दिवसा त्याला कुठेतरी भाजी विकायला, दूध दयायला, कुठेतरी भंगार वेचायला जावे लागत असे. तर आई घरकामाला गेल्यावर लहान भावंडांना सांभाळणे किंवा त्यांचा अभ्यास घ्यावा लागे.

या पोराची दहावीची परीक्षा जवळ आली नेमका त्याचवेळी तो आजारी पडला.

त्याला खोकला येऊ लागला. तो दिवसरात्र खूप खोकू लागला. म्हणून महापालिकेच्या दवाखान्यातून आई बाबांनी त्याला तपासून औषध आणलं. औषध घेऊन 'तो पोरगा' आपला अभ्यास करत होता.

पण औषध घेऊनही त्याचा खोकला कमी होत नव्हता. आजार वाढतच होता आणि एके दिवशी त्याला रक्ताची उलटी झाली. त्याच्या तोंडातून व नाकातून रक्त येऊ लागले. सर्वच घाबरले. शेजाऱ्यांना दया येऊन त्यांनी त्या पोराला खाजगी डॉक्टरकडे नेले.

डॉक्टरांनी तपासणी केली आणि म्हणाले, अहो त्याच्या छातीत काजरी जमा झाली आहे. फार गंभीर बाब आहे. सोबत आलेली आई म्हणाली, अहो डॉक्टर पण त्याची दहावीची परीक्षा आहे. काजरी म्हणजे घासलेटचा दिवा जळताना काळया रंगाचा धूर बाहेर पडून तो ज्या ठिकाणी जमा होई त्याला काजरी म्हणतात.

डॉक्टर म्हणाले, दहावी आहे तर त्याला मी औषध देतो. बघू. पण त्याला टीबी झाला व त्याचा टीबी शेवटच्या थराला पोहचला आहे. त्याची काय शाश्वती देता येत नाही. तब्येत गंभीर आहे. त्या पोरासोबत आलेली बाई रडू लागली.  इतर सोबतच्या माणसांनी तिला समजावले. औषध घेतले व घरी आले.

पण त्या पोराने मोठया हिमतीने घरी आल्यावर परत अभ्यास सुरु केला. कारण त्याला दहावी पास व्हायचं होतं. तो खालावलेल्या तब्येतीतसुध्दा अभ्यास करत होता. दहावीचे सर्व पेपर त्याने दिले. त्याचे परीक्षाकेंद्र त्याच्या झोपडीपासून सुमारे ५/६ किलोमीटर लांब होते. त्याचे घर शिवाजी नगर भांडुप व परीक्षा केंद्र सेंट झेवियर स्कूल कांजूरमार्ग येथे होते. दररोज त्याला  ५/६ किलोमीटर चालत चालत परीक्षा केंद्रावर जावे लागे व पेपर संपल्यावर तेवढेच चालत आपल्या घरी यायचा. घरी आल्यावर

उपाशी पोटी पाणी पिऊन अभ्यासाला लागायचा. त्याची तब्येत अतिशय खालावलेली असतानाही तो परीक्षा देत होता. शेवटचा पेपर त्याने दिला तोपर्यंत त्याची तब्येत अधिकच खालावली होती. १०वी चा निकाल लागेपर्यंत हा जिवंत राहिल की नाही अशी सर्वांना शंका होती.

तो धडपडत शिकत होता. त्याचे आईवडील काळजीत होते. पण तरीही त्याचे आईवडील त्याला 'शिक' म्हणायचे, तो शिकलाच पाहिजे. अशी भावना ठेऊन त्या मुलाकडे आशेने पाहत होते. म्हणून परीक्षा संपल्यानंतर तो एकटाच मुलूंडच्या महानगरपालिकेच्या दवाखान्यात गेला व आपल्या आजारावर स्वतःच उपचार करून घेतला. दररोज पायी उपचार घेण्यासाठी मुलूंडला जाई व औषध घेऊन घरी येई. कारण आईवडील यांना मोलमजुरी शिवाय मार्ग नव्हता. दहावीच्या निकालाच दिवस उजाडला. त्यावेळी म्हणजे तीसपस्तीस वर्षापूर्वी सर्व वर्तमानपत्रातून दहावीला पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचे बैठक नंबर जाहीर होत असे. पण तो पोरगा शाळेत गेला आपला रिझल्ट घेण्यासाठी तेही आपल्या फाटलेल्या हाफपॅंटवर, जी शाळेच्या गणवेषाची हाफपॅंट होती. काही ठिकाणी हातशिलाईने शिवलेली होती. त्यावर त्याने शाळेचा युनिफॉर्मचा शर्ट घातला होता पण खांदयावर शिवलेला होता वे तेही स्पष्ट दिसतही होते.

अनेक विद्यार्थी नवीन कपडे घालून आपल्या आईवडीलांसह आले होते. काहींच्या हातात पेढयाचा बॉक्स होता. हा पोरगा मात्र आपला दहावीचा निकाल बघायला घाबरत घाबरत ''एकटाच'' आला होता, वर्गातील त्याचे मित्र त्याच्याभोवती गोळा झाले.

वर्गातील सर्व मुलींनी त्याचे कौतुक केले. त्याला पेढे भरवू लागले. त्यामुळे तो लाजला. कावराबावरा झाला.

त्याला काही समजेना. तो पुढे गेला तर मोठा काळा फलक शाळेच्या

प्रवेशद्वारात होता. त्या फलकावर शाळेतून प्रथम, द्वितीय, तृतीय मुलांची नावे मार्कांसह लिहिली होती. त्यामध्ये ''द्वितीय नाव होते रमेश श्रीराम खानविलकर'' त्या पोराचे!

त्याला गणित व सायन्सचे 'डिचोलकर सर' दिसले. जे ''डिचोलकर सर'' संपूर्ण शाळेत ''मारकुटे'' म्हणून प्रसिध्द होते. त्यांना विद्यार्थ्यांनी नाव दिले ''मारकुटे सर''

ते कोणत्याच विद्यार्थ्याच्या आवडीचे नव्हते. त्या पोराचेही नव्हते. डिचोलकर सर कोणत्याच विद्यार्थ्यांशी नीट बोलत नसत. सतत विद्यार्थ्यांना मारत डिवचत त्यामुळे त्यांच्या जवळही कोणी जात नसत. तेच डिचोलकर सर त्या मुलाकडे आले व त्या मुलाचे कौतुक करू लागले. सर्वच जमलेल्या विद्यार्थ्यांना आश्चर्याचा धक्का बसला. कारण डिचोलकर सर त्या मुलांला स्वतः पेढा देवू लागले. मग इतर शिक्षकांनी व पालकांनी माझे कौतुक केले. नवीन नवीन कपडे घातलेले विद्यार्थी त्या मुलांच्या सभोवती जमा झाले व मध्ये तो पोरगा फाटक्या कपडयात उभा होता व नवीन कपडे घातलेल्या मुलांचे रिंगण त्याच्या सभोवती होते.

प्रथम व द्वितीय क्रमांकात फक्त एक मार्काचा फरक होतो. पण जो प्रथम क्रमांकाने आला होता तो श्रीमंत विदयार्थी होता. चांगल्या क्लासला तो जात होता व  जो ''फाटका'' होता ''तो पोरगा'' द्वितीय आला. त्यामुळे सर्व शाळेला, विद्यार्थ्यांना त्याचे कौतुक अधिक होते.

त्या मुलाचे १0वीचे वर्ष जेव्हा होते तेव्हा लाईट बिल न भरल्याने त्याच्या घराची लाईट कापली गेली होती त्यामुळे तो रॉकेलच्या  दिव्यावर अभ्यास करत होता. पाणी बिल खूप महिने न दिल्याने चाळीतील ''नळाचे'' पाणी बंद करण्याची स्थिती आली होती. पण शेजाऱ्यांनी त्याला मदत केली व पाणी देणे सुरु ठेवले. त्याचे वडील नोकरी शोधून शोधून दमले, त्यांना

कोणी नोकरी देत नव्हते. कारण संपूर्ण मुंबईत गिरण्यांचा संप व काही कारखान्यांचा देखील संप होता. म्हणून त्याचे वडील एका इमारतीत वॉचमन म्हणून काम करू लागले व आई एका ठिकाणी घरकाम करू लागली. त्याचे दहावीचे वर्ष व भावंडांचे शिक्षण त्याच्या वडीलांच्या वॉचमनच्या नोकरीच्या पगारात भागत नव्हते. म्हणून आईने स्टोव्हवरचा स्वयंपाक बंद करुन चुलीवर जेवण बनवण्यास सुरुवात केली. एका घराकामातून भागत नव्हते म्हणून आई आणखी २/३ ठिकाणी घरकाम करु लागली.  आई ज्या ठिकाणी घरकाम करायची त्या ठिकाणी आईला कोणी खायला दिले. तर त्याची आई ते पदरात बांधून घरी घेऊन येई व त्या मुलाला खायला देई.

संध्याकाळी घरकाम करून घरी आल्यावर चुलीवर आई जेवण बनवी. संपकाळात मोर्चाला त्याच्या वडीलांना जावे लागे. त्यामुळे वॉचमन म्हणून ज्या ठिकाणी होते तेथे गैरहजर राहू लागल्याने तेथून त्यांना कामावरून काढून टाकण्यात आले व घरचा सर्व खर्च त्याच्या आईच्या एकटीच्या घरकामातून मिळणाऱ्या पैशांवर पडला. अगोदरच भागत नव्हते आता तर एक वेळच्या जेवणाइतके देखील पैसे घरकामातून त्याच्या आईला मिळत नव्हते.

अशा वेळी दुपारी जेवणासाठी घरात काहीच नसायचे. त्याची आई जेथे कामाला होती. तेथील लोक उरलेसुरले जेवण जे टाकले जात होते ते आईला देऊ लागले. ते त्याची आई दुपारी घरी घेऊन येत असे. केव्हा केव्हा फक्त भातच असायचा. केव्हा फक्त डाळच असायची. तर केव्हा फक्त चपातीच असायची. कारण ते उरलेले टाकून दयायचे जेवण असायचे. पण ते आई त्याला व त्याच्या भावंडांना सारख्या प्रमाणात पुरवायची व पुन्हा कामावर जायची. जसा एक पक्षी असतो तो आपल्या पोटात अन्न साठवतो व घरट्यात गेल्यावर खाल्लेले अन्न पुन्हा चोचीत काढून आपल्या

घरट्यातील चिमण्या  पाखरांच्या चोचीत चोच घालून भरवतो तशीत 'त्याची माय' होती.

अशा परिस्थितीत घरातील सर्व डबेच रिकामे असत. काही पितळेची भांडी त्याच्या वडिलांनी धान्यासाठी विकली होती. जी भांडी शिल्लक होती ती तुटकी व फुटकी होती. पण त्याही स्थितीमध्ये तर घरी कोणी त्यांचा पाहुणा आला तर त्याची आई त्या दिवशी काहीतरी कारण सांगू कामाची सुट्टी घ्यायची. कोणाकडून तरी उसनवार करून, तेवढया दिवसापुरता स्वयंपाक करता येईल त्याकरिता पाव किलो पीठ, पाव किलो तांदूळ, १ रुपयाचा मसाला, २ रुपयाची भाजी,  २ रुपयाचे तेल वाटीमधून आणून त्याची आई पाहुणे येण्यापूर्वीच चुलीवर स्वयंपाक करुन बनवून ठेवी. त्याला व त्याच्या भावंडांना सांगे 'ते कोणी खायचे नाही, हे आपल्याकडे पाहुणे येत आहेत त्यांच्यासाठी आहे, बरं. तो व त्याची भावंडे तिची आज्ञा शिरसावंद्य पाळत असे. त्याची आई चूलदेखील झाकून ठेवत असे. कोणाला दिसू नये चुलीवर स्वयंपाक केला म्हणून. आलेला पाहुणा तृप्त जेवून जाई. आईचे स्वतः घरकाम करणे,  त्याच्या वडीलांना नोकरी नाही, घरात काहीच धान्य नाही, स्वयंपाक चुलीवर बनविला यांचा कशाचाही पत्ता त्या पाहुण्याला लागू दयायची नाही. या मोहिमेत तो व भावंडदेखील सहभागी होत असत.

त्या मुलांच्या आईची देवावर मात्र अपार श्रध्दा होती. अगदी पहाटे ५ वाजता उठून किमान दीड/दोन तास ती देवाची पूजा करीत असे व ती सवय तिने त्या मुलालाही लावली होती. एक मात्र असे, त्याची आई आपले दुःख कोणाही नातेवाईकांना कधीच सांगत नसे. पण तेच दुःख ती पूजा झाल्यावर देवाला सांगे. पण त्याच्याकडे काही मागत नसे. तिची श्रध्दा होती की परमेश्वर सर्व पाहत असतो. आपण फक्त त्याला सांगावे. त्यावर उपाय तो परमेश्वरच शोधतो. संतोषीमातेचे व्रत ती अतिशय कडक करीत असे व त्या

मुलाकडून व त्याच्या भावंडांकडून ते करून घेत असे. त्या मुलाकडून पोथी वाचून घेत असे.

अश्या अवस्थेत त्याची आई एकदा आजारी पडली. तो १३/१४ वर्षाचा असेन. तो आईला महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये घेऊन गेला. औषधोपचार चालू झाले पण तब्येतीमध्ये काही सुधारणा होत नव्हती तेव्हा डॉक्टरने त्याच्या आईला सांगितले, तुमचे ऑपरेशन करावे लागेल. आई मुलाकडे व मुलगा आईकडे बघू लागला. आईने डॉक्टरला सांगितले ''आम्ही उदया सांगतो'' आणि ते घरी गेले.

त्यांनी वडीलांना सांगितले. त्याच्या वडीलांनी नुकतेच एक घर दुरूस्त करण्याचे काम घेतले होते . १५०/२०० रुपये मिळणार होते. म्हणून त्याचे वडील म्हणाले, ''आठदहा '' दिवसांनी बघू.

दुसऱ्या दिवशी त्याचे वडील कामावर गेले. त्याच्या आईच्या पोटात प्रचंड दुखायला लागले. म्हणून तो व आई महानगरपालिकेच्या त्याच डॉक्टरकडे गेले. तर डॉक्टर म्हणाले, ''तुम्हांला सांगितले ना ताबडतोब ऑपरेशन करणे आवश्यक आहे, नाहीतर मी जबाबदार नाही, काहीही होईल.'' डॉक्टर त्याच्या आईला म्हणाले, ''तुमचा जीव जाईल.''

'जीव जाईल' हे शब्द त्या मुलाच्या कानावर पडले. कशासाठी ? कोणता आजार ? कोणते डॉक्टर व ऑपरेशन कसले ?

त्याची त्या मुलाला काहीच माहिती नव्हती. पण डॉक्टर त्याच्या आईला समजावत होते. ''अहो, बाई तुम्ही ताबडतोब सायन हॉस्पिटलला माझी चिट्ठी घेऊन जा, तिथे इलाज होईल व चारपाच दिवसांनी तुम्हांला घरी सोडतील.''

आई ऑपरेशनला तयार नव्हती. कारण ऑपरेशन होईल पण औषधाला पैसे नव्हते असे तिने डॉक्टरांना सांगितले, तेव्हा डॉक्टर

म्हणाले, सायन हॉस्पिटलमध्ये जा, ऑपरेशन, औषध, जेवण सगळं फुकट भेटेल. तुम्ही बरे व्हाल.

त्याने डॉक्टरचे समजावणे ऐकले. आई त्रासाने रडत होती. अशाच अवस्थेत तो १३/१४ वर्षाचा असूनही एकटयाने आईला सायन हॉस्पिटलमध्ये बसमधून नेले. तेव्हा तिकीटचा भाव १रुपया, दीड रुपया असायचा. आईचे हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन झाले. शुध्दीवर यायला संध्याकाळ झाली. संध्याकाळी हॉस्पिटलच्या नर्स म्हणू लागल्या, इथे कुणाला थांबता येणार नाही. आई मुलाकडे बघत होती. मुलगा आईला म्हणाला, ''मी सकाळी येतो, अण्णांना माहित नाही'' शिवाय भावंड एकटीच घरात आहे. याचा विसर त्याला व त्याच्या आईला ऑपरेशनच्या गडबडीत पडला. त्यावेळी त्याचे वय १३/१४ वर्षाचे असेल.

हॉस्पिटलमधून तो एकटाच बाहेर पडला. त्याला गाडीची व प्रवासाच्या साधनांची काहीच माहिती नव्हती. ट्रेन प्रवास माहिती नव्हता. खिशात पैसे नव्हते. कुठली गाडी कुठे जाते याचीही कल्पना नव्हती. त्याने मनात देवाचे स्मरण केले व रस्त्यावरच्या माणसाला विचारले, या रस्त्याचा शेवट कुठे होतो ? तो म्हणाला, 'मुलुंड चेकनाक्याला, बस ! त्या मुलाला दुवा सापडला. सायन हॉस्पिटलमधून तो चालत चालत विचारत विचारत... ३/४तास चालून रात्री दहाच्या आसपास त्याच्या घरी पोहचला. तर घरात आजूबाजूची माणसं जमलेली. त्याच्या वडीलांनी त्याला पाहिल्याबरोबर रागाने विचारले, ''कुठे होतास ?'' जो तो विचारू लागला. त्याने घडलेली सर्व हकीकत सांगितली. तेव्हा सर्वांना धीर आला. चारपाच दिवसांनी त्याची आई घरी आली व पुन्हा ती घरकाम करू लागली.

त्याची 'आई' अशा बिकट अवस्थेत खूप त्रासलेली होती. पण ते दु:ख तिने स्वतः भोगले. त्याचा दहावीचा अभ्यास त्याने घासलेटच्या

दिव्यावर केला. पेपरच्या शेवटच्या दिवशी त्याला रक्ताची उलटी झाली व त्याही अवस्थेत आईने त्याला चालत चालत कांजूरमार्ग या ठिकाणी पेपर देण्यासाठी नेले.

तो शिक्षण सोडून नोकरी करावी या मनस्थितीत होता, पण आईने तो पास झाल्यावर संपूर्ण शाळेत दुसरा आल्यावर गळयातील एक मणी मंगळसूत्र विकून आणलेल्या पैशातून पेढे आणून वाटले. चाळीतील लोकांनी व विभागातील लोकांनी त्याला २१ रुपये, ५१ रुपये, १०१ रुपये असे बक्षिस म्हणून पाकीटातून पैसे देऊन सत्कार केला. तेव्हा तिचा ऊर अगदी भरून आला होता व तिने निश्चित केले की कोणीही शिकले नाही तरी चालेल पण रमेश मात्र एकटा शिकला पाहिजे. हा तिचा निर्णय निश्चितच त्याला प्रेरणा देऊन गेला व त्याने शिक्षण घेण्याचा निश्चय करून त्या बिकट अवस्थेत शिक्षण पूर्ण केले. आईने एक मण्याचे मंगळसूत्र विकून पेढे वाटले व त्याच्या वडिलांनी प्राव्हिडंड फंडाची रक्कम काढून त्याच्या कॉलेजची फी भरून कॉलेजमध्ये जाण्यासाठी पहिल्यांदा नवीन कपडे शिवले.

''तो पोरगा'' पुढे मोठा झाला. महाविद्यालयात गेला, पदवी घेतली.

त्याने आपले शिक्षण पूर्ण केले.

महाविद्यालयातून बाहेर पडल्याबरोबर वयाच्या २१ व्या वर्षी त्याने स्वतः शिक्षण संस्था काढली व वयाच्या २४ व्या वर्षी पहिली शाळा भांडुपमधील आदिवासी भागात सुरु केली, ती सुध्दा गोरगरिबांच्या मुलांसाठी, आदिवासी पाडयातील मुलांसाठी. शिक्षण संस्था काढताना व शाळा उभी करताना त्याच्याकडे पैसे नव्हते पण तो पोरगा सकाळी ७ ते रात्री १० सतत विविध क्लासेस मधून शिकवून श्रीमंत मुलांच्या घरी जाऊन त्याची शिकवणी घेऊन पैसे जमा करून ठेवी व तेच पैसे पुढे त्याने

शिक्षण संस्था व शाळेसाठी वापरले. सतत १७ ते १८ तास काम करून कमावलेले सर्व पैसे त्याने शाळा उभारणीस खर्च केले.

शाळा उभी करताना 'त्या पोरावर' अनेकांनी प्राणघातक हल्ले केले. तलवारीचे वार केले. त्याला ठार मारण्यासाठी गोळया घातल्या. गुंडांनी त्याचे हातपाय तोडले. पण तरीही 'तो पोरगा' जिवंत राहिला. प्रत्येक प्राणघातक हल्ल्यात जखमी झाला. महिना महिना हॉस्पिटल मध्ये राहिला. पण पुन्हा हॉस्पिटमधून येऊन शाळा उभारायला लागला. शेवटी शत्रू दमला व त्याला ठार कसा मारता येईल यासाठी कट कारस्थान करू लागले. पण त्याची देवावर श्रध्दा होती. सिध्दीविनायक त्याच्या पाठीशी असल्याने दरवेळेला 'तो पोरगा' विजयी झाला.

पुढे त्या मुलाने शाळा, ज्युनिअर कॉलेज, बी.एड, कॉलेज, डी. एड, कॉलेज, वसतीगृह,  इंग्लिश मिडीयम स्कूल देखील सुरू केले.

आज तोच पोरगा कित्येक इंटरनॅशनल स्कूलचा सल्लागार म्हणून काम पाहतो, कित्येकांना मार्गदर्शन करतो.

आज तोच पोरगा महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याच्या नेमलेल्या उपाय योजना समितीवर काम करतो. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या दप्तरांचे ओई कसे कमी करता येईल? याबाबत शासनाला मार्गदर्शन करतो. त्याच्या समितीचे सुचविलेले सर्व उपाय शासन व मुंबई हायकोर्ट देखील मान्य करते. शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने परीक्षेत सुधारणा करिता खानविलकर समिती म्हणून त्यांच्या नावे शिक्षण समिती स्थापन केली. हे प्रचंड मोठे यश व मान आहे, की शिक्षण सुधारणा समितीला 'खानविलकर समिती' हे नाव पडले. जे इतिहासात कायम राहिल.

तो ज्या उपाययोजना समितीवर काम करीत होता. त्या समितीमध्ये

महाराष्ट्र शासनाचे शिक्षण संचालक व महाराष्ट्रातील अतिशय विदवान, शिक्षण तज्ञ होते. त्यांच्या सोबत त्या पोराने काम केले व चांगले काम केले म्हणून एके दिवशी माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ''मातोश्री'' बंगल्यावरून चहापान भेटीचे निमंत्रण मिळाले व दस्तुरखुद्द आताचे मुख्यमंत्री माननीय उध्दवजी ठाकरे यांनी सुमारे २ तास दप्तराचे ओझे उपाय योजना समितीसोबत चर्चा केली.

त्यावेळी ''तोच पोरगा'' मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे यांच्या समोर बसून शासनाचे शिक्षण धोरण, महाराष्ट्रातील गोरगरीब विद्यार्थी यांचे दप्तराचे ओझे कमी कसे करता येईल यावर उपाययोजना बाबत चर्चा करीत होता. त्याच्या हुशारीचे सर्वांनी कौतुक केले. एके दिवशी ''तोच पोरगा'' महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेवर ''अशासकीय सदस्य'' म्हणून काम करून आपल्या कार्याची, कर्तृत्वाची छाप त्यानी सर्व महाराष्ट्रभर पाडली.

आणि एके दिवशी मराठी विश्वकोशाच्या अध्यक्षा, विश्वविख्यात मराठी साहित्यामधील लेखिका डॉ. विजयाताई वाड यांनी त्याच पोराच्या आयुष्यावर पुस्तक लिहिले ''वादळवाट'' ज्या पुस्तकाची पहिल्या आठवडयातच प्रचंड विक्री झाली. अनेक राजकीय नेते, अभिनेते, अधिकारी, पोलिस अधिकारी, साहित्यिक यांनीही ''वादळवाट'' पुस्तक वाचून त्याचे कौतुक तर केलेच. पण प्रत्येकानी ५०/५० पुस्तकाच्या प्रती विकत घेऊन इतरांना ''पुस्तकाची भेट'' दिली.

तो पोरगा कोण माहित आहे ?
ज्याला लोक ''कर्मयोगी'' म्हणतात
तो रमेश खानविलकर.

✦✦✦✦✦✦



# चला वाचूया !

मुले वाचत नाही. पुस्तकांना 'आपलं' म्हणत नाहीत असं ठाण्याच्या बालसाहित्य संमेलनात दिसून आलं. केवळ 'भूमिका विक्रांत शिंदे' हिच्याशिवाय कोणत्याही विद्यार्थ्यास पाच पुस्तकांची नावे सांगता आली नाहीत. या गोष्टीची मनाला खूप खंत वाटली. एवढे चांगले चांगले बालसाहित्य असताना मुलांकडून हे अपेक्षित नव्हते. आम्ही मुलांसाठी 'चला वाचूया' हा प्रकल्प सुरु केला आणि मस्त १६ पानी रंगीत पुस्तकांचा संकल्प सोडला. या प्रकल्पाचे विशेष म्हणजे आम्ही जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहचून त्यांना वाचतं करण्याच्या प्रयत्नात आहोत. पाणिनी प्रकाशन व निशिगंधा वाड एज्यु. अँड कल्चरल ट्रस्ट तर्फे डॉ. विजया वाड, श्री. एकनाथ आव्हाड, सौ. संगीता चव्हाण, रमेश खानविलकर यांची पुस्तके 'चला वाचूया' या प्रकल्पाद्वारे प्रत्येक बालदोस्तांपर्यंत पोहचवित आहोत.



पाणिनी प्रकाशन, ठाणे

मूल्य २५/- रु. फक्त